COMMONWEALTH PARLIAMENTARY ASSOCIATION






# राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित (हिवाळी अधिवेशन, नागपूर)

## ५१ वा संसदीय अभ्यासवर्ग अहवाल

स्थळ
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन नागपूर
(८ ते १३ डिसेंबर २०२५)

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## मार्गदर्शक

**प्रा. संजीव सोनवणे**
कुलगुरू
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन**
प्र-कुलगुरू
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. गोविंद कतलाकुटे**
कुलसचिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. नागार्जुन वाडेकर**
संचालक
मानवव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित (हिवाळी अधिवेशन नागपूर)

## सहभागी विद्यार्थी

**गट प्रमुख : डॉ. सुनील भारोडकर (शैक्षणिक संयोजक) सहाय्यक प्राध्यापक स्तर**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासकेंद्राचे नाव |
|---|---|---|
| १. | मयुरी भिमराव जामनिक | श्री. शिवाजी महाविद्यालय, अमरावती |
| २. | आदित्य रवींद्र गावंडे | श्री. शिवाजी महाविद्यालय, अमरावती |
| ३. | दिव्या कैलाश आबेकर | के. टी. एच. एम.कॉलेज, नाशिक |
| ४. | मोहन संजय भांगरे | के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक |
| ५. | अस्मिता भद्रीनाथ ढेंबारे | यशवंत महाविद्यालय, नांदेड |
| ६. | विनायक माणिक यादव | महावीर कॉलेज, कोल्हापूर |

# राष्ट्रकुल संसदीय मंडळ

## पार्श्वभूमी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, (Commonwealth Parliamentary Association CPA) ही राष्ट्रकुल देशांतील संसद व विधिमंडळांमधील लोकप्रतिनिधींना एकत्र आणणारी आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या मंडळाची स्थापना इंग्लडमध्ये १९१९ मध्ये झाली. जगातील ५३ देशांमध्ये या मंडळाच्या शाखा आहेत. यांचे मुख्यालय लंडन (ब्रिटन) येथे असून यामध्ये विकसित तसेच अविकसित राष्ट्रे, विविध धर्म, भाषा, विभिन्न संस्कृती असलेली या मंडळाची राष्ट्रे सभासद आहेत.

हे मंडळ म्हणजे शांतता, समृद्धी, प्रतिष्ठा, समता, व्यक्तीस्वतंत्र, कायदा व सुव्यवस्था, तसेच प्रत्येक राष्ट्राच्या समाजजीवनात आवश्यक असलेल्या निष्ठा इत्यादी बाबतीत सर्व राष्ट्रांना एकत्रित बांधून ठेवणारा दुवा आहे. लोकशाही मूल्ये, संसदीय परंपरा, सुशासन आणि विधिमंडळांची कार्यक्षमता वाढवणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाची राज्य पातळीवर शाखा स्थापन करणारे व त्याद्वारे विविध उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. १८ जुलै १९५२ पासून राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा राज्यात कार्यरत आहे. नागपूर येथे दरवर्षी होणाऱ्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने सन १९६४ पासून राज्यातील सर्व विद्यापीठातील लोकप्रशासन व राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर पदवी व अधिव्याख्यात्यांना संसदीय शासनप्रणालीचे सैद्धांतिक व व्यावहारिक पैलू, विधिमंडळाचे कामकाज, प्रश्नोत्तर तास, चर्चा-नियम, समिती प्रणाली, विधेयक प्रक्रिया, अर्थसंकल्पीय कार्यपद्धती तसेच लोकप्रतिनिधी व प्रशासन यांतील परस्परसंबंध यांची प्रत्यक्ष माहिती व्हावी या उद्देशाने 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या विषयावर अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येतो. या अभ्यासवर्गात तज्ज्ञ व जेष्ठ मार्गदर्शकांची व्याख्याने, विधिमंडळ सभागृहातील प्रत्यक्ष निरीक्षण, संवाद सत्रे व चर्चात्मक उपक्रम यांचा समावेश असतो.

यावर्षी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या अभ्यासवर्गात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठतील एक सहाय्यक प्राध्यापक व सहा विद्यार्थी यांनी दिनांक ८ ते १३ डिसेंबर २०२५ दरम्यान महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, नागपूर येथे सक्रीय सहभाग घेतला.

## पहिला दिवस – ९ डिसेंबर २०२५

| अ.क्र. | तज्ञ / वक्ते/ मार्गदर्शक | विभाग /तपशील |
|---|---|---|
| १ | **श्री. देवेंद्र फडणवीस**<br>मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य<br>**मा. ॲड. राहुल नार्वेकर**<br>अध्यक्ष, विधानसभा<br>**मा. प्रा. राम शिंदे**<br>सभापती, विधान परिषद<br>**डॉ. नीलम गोऱ्हे**<br>उपसभापती, विधान परिषद<br>**ॲड. आशिष शेलार**<br>सांस्कृतिक मंत्री<br>**श्रीमती. मेघना तळेकर**<br>विधिमंडळ सचिव<br>**श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी**<br>अवर सचिव<br>महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय<br><br>सकाळी ८ ते १०<br>(स्थळ : महाराष्ट्र विधानमंडळ, नागपूर) | **संसदीय अभ्यासवर्गाचे उद्घाटन सत्र**<br>५१ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. यावेळी मा. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी भारतातील संसदीय व्यवस्थेबाबत मार्गदर्शन केले. भारतीय संविधानावर लोकशाहीचा डोलारा अवलंबून आहे. त्यासाठी संसदीय लोकशाही प्रथा व परंपरांची ओळख विद्यार्थीवर्गाला होण्यासाठी या अभ्यासवर्गाचे महत्व आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. तसेच मा. **ॲड. राहुल नार्वेकर**, विधानसभा अध्यक्ष यांनी राष्ट्रकुल संसदीय मंडळाविषयी माहिती देऊन या अभ्यासवर्गाचा सुवर्ण महोत्सव साजरा करणारे महाराष्ट्र विधानमंडळ हे पहिले राज्य आहे, असे सांगितले. **प्रा. राम शिंदे,** सभापती, विधान परिषद यांनी संसदीय अभ्यासवर्गाच्या माध्यमातून विविध विद्यार्थी हे लोकप्रतिनिधींची भूमिका व कार्य पाहून लोकशाहीबाबत असलेला दृष्टीकोन मजबूत होईल, असे मत मांडले.<br>शेवटी, विधिमंडळ सचिव **श्रीमती. मेघना तळेकर** यांनी संसदीय अभ्यासवर्ग उद्घाटन समारंभ समारोपात प्रमुख पाहुणे व उद्घाटक यांचे आभार मानले.<br>(शेवटी सर्व मान्यवर व विद्यार्थ्यांचा विधानभवनासमोर सामुहिक फोटो घेतला गेला.) |
| २ | सकाळी ११ ते दु.०१ पर्यंत | विधानपरिषद सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी /अध्यापक यांना कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध होती. यावेळी जेष्ठ सदस्य विविध लोकशाहीतील आयुधांचा वापर करून प्रश्नांची मांडणी करतांना पाहता आले. |
| ३ | दु. १ ते २ | विश्रांती |
| ४ | दु. २ ते ३ | विधान भवनातील विविध कार्यालयांना भेट- या भेटीत अधिकारी वर्ग यांनी विधान भवनातील विविध कक्षातील कामकाज पद्धती, प्रक्रिया समजून सांगितली. |
| ५ | दु. ३ ते ५ | यावेळेत विधानसभा सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना विधानसभेतील कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विधानसभेचे सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात विविध आयुधांच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील जनतेचे प्रश्न,अडचणी मांडत असताना पाहता आले. |

## दुसरा दिवस – १० डिसेंबर २०२५

| अ.क्र. | तज्ञ / वक्ते/ मार्गदर्शक | विभाग /तपशील |
|---|---|---|
| १ | **डॉ. नीलम गोऱ्हे**<br>उपसभापती, विधान परिषद<br><br>**श्री. विजय वडेट्टीवार**<br>विधान सभा सदस्य<br><br>**श्रीमती. मेघना तळेकर**<br>विधिमंडळ सचिव<br><br>सकाळी ८ ते १०<br>(स्थळ : महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, नागपूर ) | **संसदीय अभ्यासवर्ग – उद्बोधन सत्र**<br>या उद्बोधन सत्रात **डॉ. नीलम गोऱ्हे** उपसभापती, विधान परिषद यांनी 'संसदीय आयुधे व लोकशाही प्रणालीमध्ये आयुधांचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र विधानमंडळात प्रश्नोत्तरांचा तास, शून्य प्रहर, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव आणि ठराव यांसारखी संसदीय आयुधे सदस्यांना सरकारवर नियंत्रण ठेवण्याची संधी देतात. या आयुधांच्या माध्यमातून तातडीचे सार्वजनिक प्रश्न मांडले जातात आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्व सुनिश्चित केले जाते. लोकशाहीतील पारदर्शकता, जबाबदारी आणि जनहित जपण्यासाठी ही संसदीय साधने अत्यंत महत्त्वाची ठरतात, असे विचार डॉ. गोऱ्हे यांनी या सत्रात मांडले.<br>दुसरे वक्ते **श्री. विजय वडेट्टीवार** यांनी संसदीय लोकशाहीत सत्तारूढ पक्ष शासन चालवणे, धोरणनिर्मिती करणे आणि जनतेला उत्तरदायी राहणे ही मुख्य भूमिका बजावतो. तर विरोधी पक्ष सरकारच्या कामकाजावर टीका करत नियंत्रण ठेवून पर्यायी धोरणे मांडत लोकशाही संतुलन राखतो. त्यासाठी सत्तारूढ आणि विरोधी पक्षअसे दोन्ही पक्षांचे संविधान, संसदीय परंपरा आणि जनहित यांचे पालन करून लोकशाही बळकट करणे हेच कर्तव्य असे विचार मांडले. या सत्राच्या शेवटी विधिमंडळ सचिव श्रीमती. मेघना तळेकर यांनी या सत्राला उपस्थित प्रमुख पाहुणे व वक्ते यांचे आभार मानले. |
| २ | सकाळी ११ ते दु.०१ पर्यंत | यावेळेत विधानसभा सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना विधानसभेतील कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विधानसभेचे सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात विविध आयुधांच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील जनतेचे प्रश्न,अडचणी मांडत असताना प्रतक्ष पाहता आले. |
| ३ | दु. १ ते २ | विश्रांती |
| ४ | दु. २ ते ३ | ग्रंथालय भेट - विधानभवनातील ग्रंथालय जुने असून अनेक दुर्मिळ ग्रंथ, भाषणांचे खंड, विविध अहवाल, वृत्तपत्रे, कात्रणे इत्यादींचा संग्रह यामध्ये असून सर्वांना त्याचे अवलोकन करता आले. |
| ५ | सायं. ३ ते ६ | विधानपरिषद सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. जेष्ठ सदस्य लोकशाहीतील विविध आयुधांचा वापर करून राज्यातील विविध प्रश्नांची मांडणी करताना पाहता आले. |

## तिसरा दिवस – ११ डिसेंबर २०२५

| अ.क्र. | तज्ञ / वक्ते/ मार्गदर्शक | विभाग /तपशील |
|---|---|---|
| १ | **डॉ. विलास आठवले**<br>प्रधान सचिव, विधान मंडळ<br>**श्री. सुधीर मूनगंटीवार**<br>विधानसभा सदस्य व माजी मंत्री<br>**श्रीमती. मेघना तळेकर**<br>विधिमंडळ सचिव<br>**श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी**<br>अवर सचिव<br>महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय<br><br>सकाळी ८ ते १०<br>(स्थळ : महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, नागपूर ) | **संसदीय अभ्यासवर्ग – उद्बोधन सत्र**<br>**डॉ. विलास आठवले** यांनी सभागृहातील दैनिक कामकाजाची पद्धती, अधिकारी वर्गाची भूमिका, पीठासीन अधिकाऱ्याची जबाबदारी, विधेयक मसुदा, प्रश्न-उत्तर पद्धती, विधिमंडळ सदस्य यांचे अधिकार याबाबत या सत्रात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अर्थसंकल्प, पुरवणी मागण्या, मंत्रालयाची भूमिका याबाबत सविस्तर उत्तरे त्यांनी दिली.<br>दुसरे वक्ते **श्री. सुधीर मूनगंटीवार** यांनी 'कायदे निर्मितीची प्रक्रिया व दोन्ही सभागृहाचे अधिकार' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कायदेनिर्मितीची प्रक्रिया, विधेयक मांडणीपासून चर्चा, दुरुस्ती व मतदानानंतर राज्यपालांच्या मंजुरीपर्यंत पूर्ण होते. विधानसभा व विधानपरिषद दोन्ही सभागृहांना विधेयकावर चर्चा व दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, मात्र अर्थविधेयकात विधानसभेचे प्राधान्य असते. दोन्ही सभागृहांमधील समन्वयातून लोकहिताचे कायदे प्रभावीपणे संमत होतात. यासाठी संसदीय प्रथा व परंपरांचे योगदान आहे, असे त्यांनी सांगितले.<br>शेवटी विधिमंडळ सचिव श्रीमती. मेघना तळेकर यांनी या सत्राला उपस्थित वक्त्यांचे आभार मानले. |
| २ | सकाळी ११ ते दु.०१ पर्यंत | यावेळेत विधानसभा सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना विधानसभेतील कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विधानसभेचे सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात विविध आयुधांच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील जनतेचे प्रश्न,अडचणी मांडत असताना पाहता आले. |
| ३ | दु. १ ते २ | विश्रांती |
| ४ | दु. २ ते ४ | विविध समित्यांना भेट- विधानभवनातील कार्यरत सार्वजनिक लेखा समिती, अंदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विधीमंडळ आश्वासन समिती, याचिका समिती, शासकीय उपक्रम समिती, पंचायतराज समिती तसेच विविध अहवाल याचे अवलोकन केले. विधानमंडळातील विविध समित्या प्रशासनाच्या कामकाजाची सखोल तपासणी करून पारदर्शकता व कार्यक्षमता वाढवतात. या समित्यांमुळे सभागृहाबाहेरही लोकशाही देखरेख आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होते, असे समजले. |
| ५ | सायं.४ ते ६ | विधानपरिषद सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. जेष्ठ सदस्य लोकशाहीतील विविध आयुधांचा वापर करून राज्यातील विविध प्रश्नांची मांडणी करताना पाहता आले. |

## चौथा दिवस — १२ डिसेंबर २०२५

| अ.क्र. | तज्ञ / वक्ते/ मार्गदर्शक | विभाग /तपशील |
|---|---|---|
| १ | **श्री. एकनाथ शिंदे**<br>उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य<br><br>**श्री. चंद्रकांतदादा पाटील**<br>संसदीय कार्य मंत्री<br><br>**श्री. यदु जोशी**<br>राजकीय संपादक,दै.लोकमत<br><br>**श्रीमती. मेघना तळेकर**<br>विधिमंडळ सचिव<br><br>**श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी**<br>अवर सचिव<br>महाराष्ट्र विधान मंडळ<br>सचिवालय<br><br>सकाळी ८ ते १०<br>(स्थळ : महाराष्ट्र<br>विधानमंडळ,<br>विधान भवन, नागपूर ) | **श्री. एकनाथ शिंदे** यांनी 'लोकप्रतिनिधींची मतदारसंघाप्रती असलेली जबाबदारी आणि त्यासाठी सभागृहाच्या माध्यमातून उपलब्ध असलेले संविधानिक व्यासपीठ'या विषयाच्या अनुषंगाने या सत्रात मांडणी केली. लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघातील समस्या, अपेक्षा व जनहिताचे प्रश्न सभागृहाच्या माध्यमातून मांडणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी असल्याचे प्रमुख वक्त्यांनी स्पष्ट केले. प्रश्नोत्तरांचा तास, लक्षवेधी सूचना, शून्य प्रहर आणि विविध समित्या ही संविधानाने दिलेली प्रभावी व्यासपीठे असून त्यांचा जबाबदार वापर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या संसदीय साधनांद्वारे जनतेचा आवाज थेट शासनापर्यंत पोहोचवून लोकशाही अधिक सक्षम करता येते, असे मत त्यांनी व्यक्त केले. शेवटी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे त्यांनी दिली.<br>दुसरे वक्ते **श्री. चंद्रकांतदादा पाटील** यांनी 'संसदीय लोकशाहीत पक्षसंघटनेचे महत्व व योगदान जबाबदारी व लोकशाहीपुढील आव्हाने'या विषयाला अनुसरून विषयाची मांडणी केली. संसदीय लोकशाहीत पक्षसंघटना या जनतेच्या अपेक्षा, विचारधारा आणि धोरणे शासनप्रक्रियेत रूपांतरित करण्याचे महत्त्वाचे माध्यम असल्याचे प्रमुख वक्त्यांनी नमूद केले. मात्र, व्यक्तिकेंद्री राजकारण, पक्षांतर्गत लोकशाहीचा अभाव आणि वाढते ध्रुवीकरण ही लोकशाहीपुढील गंभीर आव्हाने असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. तर **श्री. यदु जोशी** यांनी विधिमंडळाच्या कामकाजावर प्रकाश टाकून प्रसारमाध्यमे शासन व्यवहारातील पारदर्शकता व लोकशाही उत्तरदायित्व वाढवण्याचे कार्य करतात. तसेच जबाबदार, तथ्याधारित आणि संवेदनशील पत्रकारितेमुळे नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढतो, असे त्यांनी नमूद केले. शेवटी विधिमंडळ सचिव श्रीमती मेघना तळेकर यांनी या सत्राला उपस्थित वक्त्यांचे आभार मानले. |
| २ | सकाळी ११.०० ते दु. ०१.०० | यावेळेत विधानसभा सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी / अध्यापक यांना विधानसभेतील कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विधानसभेचे सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात विविध आयुधांच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील जनतेचे प्रश्न, अडचणी मांडत असताना पाहता आले. |
| ३ | दु. १ ते १. ३० | विश्रांती |
| ४ | दु. १.३० ते २.३० | श्री. अमित झनक - विधानसभा सदस्य यांनी 'ग्रामीण विकास व लोकप्रतिनिधींची भूमिका' या विषयावर व्याख्यान दिले. |
| ५ | दु.२.३० ते ४.०० | विविध कक्षांना व पक्ष कार्यालयांना भेट |
| ६ | सायं.४. ०० ते ६.०० | विधानपरिषद सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी/अध्यापक यांना कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. जेष्ठ सदस्य लोकशाहीतील विविध आयुधांचा वापर करून राज्यातील विविध प्रश्नांची मांडणी करताना पाहता आले. |

## पाचवा दिवस – १३ डिसेंबर २०२५

| अ.क्र. | तज्ञ / वक्ते/ मार्गदर्शक | विभाग / तपशील |
|---|---|---|
| १ | **श्री. नितीन गडकरी**<br>केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री<br>भारत सरकार<br>**श्री. देवेंद्र फडणवीस**<br>मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य<br>**मा. ॲड. राहुल नार्वेकर**<br>अध्यक्ष, विधानसभा<br>**मा. प्रा. राम शिंदे**<br>सभापती, विधान परिषद<br>**डॉ. नीलम गोऱ्हे**<br>उपसभापती, विधान परिषद<br>**श्री. एकनाथ शिंदे**<br>उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य<br>**श्रीमती मेघना तळेकर**<br>विधिमंडळ सचिव<br>**श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी**<br>अवर सचिव<br>महाराष्ट्र विधान मंडळ | **संसदीय अभ्यासवर्ग – समारोप सत्र**<br>संसदीय अभ्यासवर्ग समारोप सत्रात प्रमुख अतिथी विधानपरिषदेचे माजी सदस्य व सध्या भारत सरकारमध्ये मंत्री **श्री. नितीन गडकरी** उपस्थित होते. त्यांनी संसदीय प्रथा व परंपरा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.<br>विधानसभा अध्यक्ष **ॲड. राहुल नार्वेकर** यांनी विधिमंडळ हे जनतेच्या इच्छा व आकांक्षांच्या अभिव्यक्तीचे व्यासपीठ असल्याचे सांगितले.<br>तर विधान परिषद, सभापती, मा. **प्रा. राम शिंदे** यांनी दोन्ही सभागृहातील संसदीय लोकशाहीतील महत्वपूर्ण योगदान आणि द्विसभागृह पद्धतीमध्ये परस्परांतील समन्वय त्याविषयी मार्गदर्शन केले. मा. पीठासीन अधिकारी व मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांना प्रशस्तिपत्रकाचे वितरण करण्यात आले.<br>शेवटी विधिमंडळ सचिव **श्रीमती मेघना तळेकर** यांनी या सत्राला उपस्थित वक्त्यांचे आभार मानले. आणि अभ्यासवर्गाचा समारोप झाला. |
| २ | सकाळी ११.०० ते दु. ०१.०० | यावेळेत विधानसभा सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी/अध्यापक यांना विधानसभेतील कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. विधानसभेचे सदस्य प्रश्नोत्तराच्या तासात विविध आयुधांच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील जनतेचे प्रश्न, अडचणी मांडत असताना पाहता आले. |
| ३ | दु. १ ते १. ३० | विश्रांती |
| ४ | दु. १.३० ते ३.३० | विविध कक्षांना व पक्ष कार्यालयांना भेट |
| ५ | दु. ३.३० ते ४.३ ० | विधानपरिषद सभागृह गॅलरीमधून विद्यार्थी/अध्यापक यांना कामकाज पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. जेष्ठ सदस्य लोकशाहीतील विविध आयुधांचा वापर करून राज्यातील विविध प्रश्नांची मांडणी करताना पाहता आले. |
| ६ | सायं. ४.३० वा. | **प्रस्थान** |

**डॉ. सुनील भारोडकर**
शैक्षणिक संयोजक (राज्यशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**प्रा. नागार्जुन वाडेकर**
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे विधान भवन, नागपूर येथे दि. ८ ते १३ डिसेंबर २०२५ दरम्यान 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या विषयावर आयोजित अभ्यासवर्गासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सहभाग**




**दि. १० डिसेंबर २०२५ विधानभवन नागपूर समोर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अधिव्याख्याता व विद्यार्थी**




**दि. १० डिसेंबर २०२५ विधानभवन नागपूर समोर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अधिव्याख्याता व विद्यार्थी**



दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी विधानभवन नागपूर येथे मा. विधानसभा अध्यक्ष मा. ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे, डॉ. नीलम गोऱ्हे उपसभापती, विधान परिषद, श्री.अण्णा बनसोडे, विधानसभा उपाध्यक्ष, श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक मंत्री, श्री.चंद्रकांत दादा पाटील, संसदीय मंत्री, श्रीमती. मेघना तळेकर, श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी, विधिमंडळ सचिव, तसेच विविध विद्यापीठातील अधिव्याख्याता व सहभागी विद्यार्थी यांचे सामुहिक छायाचित्र




**विधान भवन, नागपूर येथे ८ ते १३ डिसेंबर २०२५ दरम्यान 'संसदीय कार्यप्रणाली व प्रथा' या विषयावर आयोजित अभ्यासवर्गात य. च. म. मु. विद्यापीठातील अधिव्याख्याता व सहभागी विद्यार्थी**




**दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी विधानभवन नागपूर येथे मा. श्रीमती. प्राजक्ता कुलकर्णी, विधिमंडळ उपसचिव यांच्याकडून विधान परिषद सभागृह येथे प्रशस्तीपत्र स्वीकारतांना सामुहिक छायाचित्र**

दैनिक भास्कर
नाशिक, बुधवार, 17 दिसंबर 2025 3

YCMOU PRO

# पार्लियामेंट्री बोर्ड स्टडी क्लास : ओपन यूनिवर्सिटी में छह विद्यार्थी हुए शामिल

**विद्यार्थियों को संसदीय व्यवस्था और कामकाज के बारे में दी जाती है जानकारी**

सिटी भास्कर | नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन यूनिवर्सिटी के ह्यूमैनिटीज और सोशल साइंसेज फैकल्टी के छह स्टूडेंट्स ने कॉमनवेल्थ पार्लियामेंट्री बोर्ड स्टडी क्लास में एक्टिवली हिस्सा लिया। यह स्टडी क्लास हाल ही में नागपुर में हुए विंटर सेशन के दौरान आयोजित की गई थी। शैक्षणिक समन्वयक डॉ. सुनील भरोड़कर के नेतृत्व में विश्वविद्यालय की मयूरी जामनिक, दिव्या आंबेकर, आदित्य गावंडे, मोहन भांगरे, अस्मिता ढेंबेरे और विनायक यादव ने भाग लिया। विद्यार्थियों को विश्वविद्यालय के कुलपति प्रो. संजीव सोनवणे, प्रो-वाइस चांसलर डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, रजिस्ट्रार डॉ. गोविंद कटलाकुटे और मानविकी एवं सामाजिक विज्ञान संकाय के निदेशक डॉ. नागार्जुन वाडेकर का मार्गदर्शन रहा।



**1964 से पॉलिटिकल साइंस के छात्रों के लिए जारी :** यह स्टडी क्लास 1964 से हर साल कॉमनवेल्थ पार्लियामेंट्री बोर्ड, महाराष्ट्र ब्रांच, विधान भवन (मुंबई) की ओर से पब्लिक एडमिनिस्ट्रेशन और पॉलिटिकल साइंस की पढ़ाई कर रहे पोस्टग्रेजुएट स्टूडेंट्स को पार्लियामेंट्री सिस्टम ऑफ गवर्नेंस और लेजिस्लेचर के कामकाज के बारे में फर्स्ट-हैंड जानकारी देने के मकसद से आयोजित की जाती है। संसदीय साधन, सत्ता पक्ष और विपक्ष का महत्त्व और भूमिका, लोकतांत्रिक व्यवस्था, कानून बनाने की प्रक्रिया, विधायिका की भूमिका, मीडिया जैसे महत्वपूर्ण विषयों पर विस्तृत मार्गदर्शन दिया जाता है।

YCMOU PRO

नवभारत | नाशिक प्लस

navbharatlive.com
epaper.navbharatlive.com

**स्टडी :** 6 दिन की स्टडी क्लास में राज्य के 12 विवि के करीब 72 विद्यार्थियों ने लिया हिस्सा

# सत्र में ओपन विवि के 6 छात्र हुए शामिल

■ नाशिक., (सं.) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन यूनिवर्सिटी के ह्यूमैनिटीज और सोशल साइंस फैकल्टी के 6 छात्रों ने 'कॉमनवेल्थ पार्लियामेंट्री बोर्ड' स्टडी क्लास में एक्टिवली हिस्सा लिया. यह स्टडी क्लास हाल ही में नागपुर में हुए विंटर सेशन के दौरान खत्म हुई. यह स्टडी क्लास 1964 से हर साल कॉमनवेल्थ पार्लियामेंट्री बोर्ड, महाराष्ट्र ब्रांच, विधान भवन (मुंबई) द्वारा पब्लिक एडमिनिस्ट्रेशन और पॉलिटिकल साइंस की पढ़ाई कर रहे पोस्ट ग्रेजुएट स्टूडेंट्स को पार्लियामेंट्री सिस्टम ऑफ गवर्नमेंट और लेजिस्लेचर के कामकाज के बारे में फर्स्ट हैंड जानकारी देने के मकसद से ऑर्गेनाइज की जाती है. इस साल की स्टडी क्लास का उद्घाटन राज्य के मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस ने किया.



## लेजिस्लेटिव काउंसिल के चेयरमैन रहे मौजूद

इस मौके पर लेजिस्लेटिव काउंसिल के चेयरमैन प्रो. राम शिंदे, लेजिस्लेटिव असेंबली के स्पीकर राहुल नार्वेकर, डिप्टी चीफ मिनिस्टर एकनाथ शिंदे, डिप्टी चीफ मिनिस्टर अजित पवार, लेजिस्लेटिव काउंसिल की डिप्टी चेयरमैन डॉ. नीलम गोर्हे, विधानसभा के वाइस-चेयरमैन अन्ना बनसोडे, पार्लियामेंट्री अफेयर्स मिनिस्टर चंद्रकांत पाटिल सहित कई मौजूद थे. इस स्टडी क्लास में पार्लियामेंट्री इंस्ट्रूमेंट्स, रूलिंग और अपोजिशन पार्टियों की इंपॉर्टेंस और रोल, डेमोक्रेटिक सिस्टम, लॉ मेकिंग प्रोसेस, लेजिस्लेचर का रोल, मीडिया जैसे ज़रूरी टॉपिक्स पर डिटेल में गाइडेंस दी गई.

## विधानसभा के काम के बारे में जानकारी

साथ ही स्टूडेंट्स ने विधानसभा और लेजिस्लेटिव काउंसिलवहां की अलग-अलग गवर्नमेंट कमेटियों और लाइब्रेरी का इंस्पेक्शन करके असल वर्किंग के बारे में जानकारी ली. यह स्टडी क्लास यूनियन रोड ट्रांसपोर्ट और हाईवे मिनिस्टर नितिन गडकरी की मौजूदगी में खत्म हुई. इस छह दिन की स्टडी क्लास में राज्य की 12 यूनिवर्सिटीज के करीब 72 स्टूडेंट्स मौजूद थे. एकेडमिक कोऑर्डिनेटर डॉ. सुनील भारोड़कर की लीडरशिप में ओपन यूनिवर्सिटी से 6 स्टूडेंट्स मयूरी जामनिक, दिव्या आंबेकर, आदित्य गावंडे, मोहन भांगरे, अस्मिता ढेंबेरे और विनायक यादव ने हिस्सा लिया. इन स्टूडेंट्स के साथ यूनिवर्सिटी के वाइस चांसलर प्रो. संजीव सोनवणे, प्रो-वाइस चांसलर डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, रजिस्ट्रार डॉ. गोविंद कतलाकुटे और डॉ. नागार्जुन वाडेकर ने गाइड किया.

YCMOU PRO



# नागपूर अधिवेशनात मुक्त विद्यापीठाच्या सहा विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा विद्यार्थ्यांनी राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या अभ्यासवर्गात सहभाग नोंदवला. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर दि. ८ ते १३ डिसेंबर या कालावधीत हा अभ्यासवर्ग झाला.

लोकप्रशासन व राज्यशास्त्र विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संसदीय शासन प्रणाली, विधिमंडळाची रचना व प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळावी, या उद्देशाने राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा विधान भवनतर्फे १९६४ पासून या अभ्यासवर्गाचे आयोजन केले जाते. यंदा अभ्यासवर्गाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभाध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अभ्यासवर्गात संसदीय आयुधे, सत्ताधारी व विरोधी पक्षांची भूमिका, लोकशाही प्रणाली, कायदेनिर्मिती प्रक्रिया, विधिमंडळाचे कार्य, प्रसारमाध्यमांची भूमिकेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विधानसभा, विधान परिषद, विविध शासकीय समित्या व ग्रंथालयांची पाहणी करून प्रत्यक्ष कामकाज समजून घेण्याची संधी मिळाली. अभ्यासवर्गाचा समारोप केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत झाला. सहादिवसीय अभ्यासवर्गात १२ विद्यापीठांतील ७२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

## या विद्यार्थ्यांचा सहभाग


मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक संयोजक डॉ. सुनील भारोडकर यांच्या नेतृत्वाखाली मयुरी जामनिक, दिव्या आंबेकर, आदित्य गावंडे, मोहन भांगरे, अस्मिता ढेंबरे व विनायक यादव यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे मार्गदर्शन मिळाले.

पुण्यनगरी

YCMOU PRO

07 | नाशिक | बुधवार, १७ डिसेंबर २०२५

# नागपूर अधिवेशन अभ्यासवर्गात मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग



**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रकुल संसदीय मंडळ' अभ्यासवर्गात सक्रिय सहभाग घेतला. नागपूर येथे नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान दि. ८ ते १३ डिसेंबर या कालावधीत हा अभ्यासवर्ग झाला.

लोकप्रशासन आणि राज्यशास्त्र या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संसदीय शासन प्रणाली आणि विधीमंडळ कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने १९६४ पासून राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा विधान भवन (मुंबई) यांच्यातर्फे दरवर्षी या अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. या अभ्यासवर्गाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.

या अभ्यासवर्गात संसदीय आयुधे, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे महत्त्व आणि भूमिका, लोकशाही प्रणाली, कायदे निर्मिती प्रक्रिया, विधीमंडळ भूमिका, प्रसारमाध्यमे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत अभ्यासवर्गाचा समारोप झाला. या सहादिवसीय अभ्यासवर्गासाठी राज्यातील १२ विद्यापीठांचे जवळपास ७२ विद्यार्थी उपस्थित होते. त्यात मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक संयोजक डॉ. सुनील भारोडकर यांच्या नेतृत्वाखाली मयूरी जामनिक, दिव्या आंबेकर, आदित्य गावंडे, मोहन भांगरे, अस्मिता ढेंबरे आणि विनायक यादव हे सहा विद्यार्थी सहभागी झाले. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक डॉ. नागार्जुन वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.


आपलं महानगर | My महानगर .com

YCMOU PRO

नाशिक । बुधवार १७ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी घेतली विधानपरिषद कामकाजाची माहिती

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या ६ विद्यार्थ्यांचा सहभाग



**नाशिक ।** विद्यार्थ्यांनी संसदीय आयुधे, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे महत्व आणि भूमिका, लोकशाही प्रणाली, कायदे निर्मिती प्रक्रिया, विधिमंडळ भूमिका, प्रसारमाध्यमे यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद, विविध शासकीय समित्या, ग्रंथालय यांची पाहणी करत प्रत्यक्ष कामकाजाची माहिती मिळाली. निमित्त होते, राष्ट्रकुल संसदीय मंडळ' अभ्यासवर्गाचे.

लोकप्रशासन आणि राज्यशास्त्र विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संसदीय शासन प्रणाली आणि विधिमंडळ कामकाजाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने सन १९६४ पासून राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा विधान भवन (मुंबई) यांच्यातर्फे दरवर्षी या अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. हिवाळी अधिवेशनात या अभ्यासवर्गाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. नागपूर येथे नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान ८ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत हा अभ्यासवर्ग संपन्न झाला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुंक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या सहा विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रकुल संसदीय मंडळ' अभ्यासवर्गात सक्रिय सहभाग घेतला. यावेळी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधासभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील उपस्थित होते. अभ्यासवर्गाचा समारोप केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत झाला.

### १२ विद्यापीठांच्या ७२ विद्यार्थ्यांची उपस्थिती

■ सहा दिवसीय अभ्यासवर्गासाठी राज्यातील १२ विद्यापीठांचे जवळपास ७२ विद्यार्थी उपस्थित होते. त्यात मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक संयोजक डॉ. सुनील भारोडकर यांच्या नेतृत्वाखाली मयूरी जामनिक, दिव्या आंबेकर, आदित्य गावंडे, मोहन भांगरे, अस्मिता ढेंबरे आणि विनायक यादव हे सहा विद्यार्थी सहभागी झाले. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक डॉ. नागार्जुन वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.